# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


दिनांक 23/01/2024 (मंगळवार) सकाळ

### जिवानीशी ठार करण्याचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध गुन्हा नोंद

**पोस्टे उमरेड:–** अंतर्गत पोस्टे उमरेड ते मांगरुळ फाटा ते मांगरुळ गाव ता. भिवापूर जि. नागपूर येथे दि. २३/०१/२०२४ रोजी चे सकाळी ०४/३० वा. सुमारास यातील फिर्यादी व जखमी नामे– गब्बर देवराव रेवतकर वय ४२ वर्षे राहते मंगरूळ ता. भिवापूर जि. नागपूर हे नेहमी प्रमाणे झोपेतुन उठुन मॉर्निंग वॉक करीता निघाले व घराचे समोरील रोडवर मॉर्निंग वॉक करित असतांना फिर्यादीचे मागुन आलेल्या मोटरसायकल वरील दोन अनोळखी व्यक्तींनी फिर्यादीला कोणत्यातरी अज्ञात कारणावरून ठार मारण्याचे उद्देशाने छऱ्याचे बंदुकीने फायरींग करून गावाच्या बाहेर निघुन गेले. त्यांचे बंदुकीतील एक छर्रा फिर्यादीचे चेहऱ्यावर उजव्या ओठाच्या खाली लागल्याने जखम झाली आहे. फिर्यादीवर बंदुकीने फायरींग करून जिवेनीशी ठार मारण्याचा प्रयत्न केला आहे. या घटनेत गब्बर रेवतकर हे किरकोळ जखमी झाले असुन अज्ञात मोटार सायकलवरील दोन अनोळखी इसम हे मोटार सायकलसह पळुन गेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. उमरेड येथे अनोळखी आरोपींविरुध्द कलम ३०७, ३४ भादंवि. सहकलम ३, २५ शस्त्र अधिनियम १९५९ कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर घटनास्थळी श्री. हर्ष पोद्दार (भा.पो. से.) पोलीस अधिक्षक नागपुर ग्रामीण, मा. श्री राजा पवार उपविभागीय पोलीस अधिकारी उमरेड विभाग उमरेड तसेच पोलीस निरीक्षक महेश भोरटेकर यांनी भेट दिली आहे. गुन्हयाचा पुढील तपास तपास पोलीस उपनिरीक्षक दिनेश खोटेले पोस्टे उमरेड करीत आहे.

### मोटरसायकल चोरी

**पो.स्टे. मौदा** :– अंतर्गत ०५ कि. मी. अंतरावरील सरकारी दवाखान्याचे रोडवर मौदा येथे दिनांक २१/०१/२०२४ चे १८.३० वा. दरम्यान फिर्यादी नामे– निखील विजय मोहने, वय २५ वर्ष, रा. वार्ड नं. ५ साई मंदीर मौदा यांचे वडिलाचे मित्र नामे– आकाश खंडाईत, रा. तारसा यांच्या नावावर सन २०१७ मध्ये मोटरसायकल होंडा कंपनीची सी. बी. शाईन गाडी क्र. एच. एम.–४९/एन–८१८५ ही चाचेर येथील शोरूम मधून किस्तवर घेतली होती ती गाडी फिर्यादी वापरत असून दि. २१/०१/२०२४ रोजी सायंकाळी ०६.३० वा. जयस्तंभ चौक मौदा येथे बाजार घेणेकरीता ग्रे कलर होंडा कंपनीची गाडी लॉक करून उभी ठेवली होती. १० ते १५ मिनीटा नंतर बाजार घेवून परत आले असता गाडी पाहली असता गाडी ही ठेवल्या जागी दिसली नाही. आजूबाजूला शोध घेतला असता गाडी एच. एम–४९/एन–८१८५ किंमती २०,०००/– रू. मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. मौदा येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार असलम नौरंगाबादे मो. नं. ८६६८८१६०४९ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**

**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**